# माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. ११/०५/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय व जिल्हास्तरवर बैठका होत नसलेबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी आपल्या जिल्हास्तरावर नियमितपणे संघटनांच्या त्रैमासिक सभांचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | शिक्षक शिक्षकेतर कालबध्द पदोन्नती वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्ताव शिक्षणाधिकारी मान्यता आवश्यकता नसलेबाबत.<br>आपलेकडील माध्य-२/संकीर्ण/वरिष्ठ व निवडश्रेणी/कोवि/१७/शिक्षण उपसंचालक कार्यालय यांचे दि. १० एप्रिल २०१७ या पत्राबाबत. (शासनमान्य अशासकीय खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी प्रस्ताव मंजूरी बाबत लेखाधिकारी यांचेकडून मंजूर करुन घेणेबाबत. | वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी प्रस्ताव मंजूरीबाबत लेखाधिकारी यांना मंजूरी अधिकार देण्याबाबत लेखाधिकारी यांचेसोबत बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल तसेच याबाबत दि. १८ व १९.०५.२०१८ रोजी होणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय बैठकीत चर्चा करण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक/ शिक्षणाधिकारी/ संघटना स्तरावर | -- |
| ३ | २४ वर्षे आश्वासित प्रगती योजना शिक्षकेतर कोर्ट हुकूमाप्रमाणे कार्यवाही होत नसलेबाबत रिट पिटीशन नं.७१६८/१६ व रिट पिटीशन नं. १३१९/१७ जाधव व इतर ३ व तुकाराम पाटील व इतर | मा.उच्च न्यायायल, मुंबई येथील याचिका क्र. ७१६८/२०१६ व रिट पिटीशन नं. १३१९/१७ मधील आदेश हे शासनाच्या प्रचलित धोरणांच्या विरुध्द असलेने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सांगली यांनी शासनास याबाबत अहवाल सादर करावा व सदर आदेशाविरुध्द पूर्नविलोकन याचिका सादर करावी. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सांगली | तात्काळ |
| ४ | शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडील विविध कॅम्प व चेकलिस्ट बाबत. | शिक्षक/शिक्षकेतर कालबध्दपदोन्नती बाबतचे वरिष्ठवेतनश्रेणी प्रस्ताव तपासणीबाबत संघटनेने तयार केलेली चेकलिस्ट शिक्षण उपसंचालक कार्यालयास पाठवावी. त्यामध्ये सर्व शिक्षणाधिकारी यांचेकडून अभिप्राय मागवून त्यामध्ये सुधारणा करुन ती कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. | संघटनास्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | डिसीपीएस कपात झालेल्या रकमेचे स्लिपा मिळणेबाबत | कोल्हापूर जिल्ह्याच्या सोडून बाकी सर्व जिल्ह्यांच्या डिसीपीएस स्लिपा तयार आहेत. सद्या शाळांना सुट्टी असल्यामुळे डिसीपीएस स्लिपांचे वितरण माहे जून-२०१८ मध्ये जिल्हावार कॅम्प आयोजित करुन वितरित करण्यात येईल. | लेखाधिकारी स्तरावर | माहे जून-२०१६ |
| ६ | सिंधुदुर्ग जिल्ह्यास लेखाधिकारी नियुक्तीबाबत | लेखाधिकारी पद हे वित्त विभागाअंतर्गत येत असल्यामुळे त्यांचे नियुक्ती/बदली बाबतचे अधिकार वित्त विभागास आहेत. याबाबत संघटनेने शिक्षक आमदारांमार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यात पुर्ण वेळ लेखाधिकारी मिळणेबाबत मा. अर्थ मंत्री महोदयांना निवेदन सादर करावे. | -- | -- |
| ७ | लिपीक प्रशिक्षण आयोजित करणेबाबत | सर्व शिक्षणाधिकारी यांनी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी/ स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर